# ई-गव्हर्नन्स (E-Governance) आणि महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण-२०११

**प्रा. डॉ. उमेशकुमार पी. शहारे**
(सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान,
महाविद्यालय लाखनी, जि.भंडारा – 441804
मो.नं. 9850227762
ई-मेल : kanchanumesh358@gmail.com

---

**ई-गव्हर्नन्स (E-Governance) :**

ई-गव्हर्नन्स म्हणजे माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून सरकारी सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवणे, सरकारी कामकाज अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि सोपे करणे होय. ज्यामध्ये सरकार ते नागरिक (G2C), सरकार ते व्यवसाय (G2B) आणि सरकार ते सरकार (G2G) आणि सरकार ते कर्मचारी (G2E) अशा विविध पातळ्यांवर ऑनलाइन संवाद साधला जातो. महाराष्ट्रात "आपले सरकार" सारखे उपक्रम यासाठी राबवित असतात. उदा. आधार कार्ड, आधार सेवा, प्रमाणपत्र इत्यादी.

**ई-गव्हर्नन्स म्हणजे काय?**

**व्याख्या :**

सरकारी सेवा पुरविण्यासाठी, माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी आणि प्रक्रिया सुलभ करण्यासाठी इंटरनेट, मोबाईल आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर करणे म्हणजे ई-गव्हर्नन्स होय.

**उद्देश :**

प्रशासनात पारदर्शकता आणणे, नागरिकांचा वेळ वाचविणे (कार्यालयात न जाता सेवा मिळवणे), आणि सरकारी कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे.

**मुख्य घटक आणि प्रकार :**

**१) G2C (सरकार ते नागरिक) :** नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरणे, प्रमाणपत्र मिळविणे, बिल भरणे इत्यादी सुविधा देते.

**२) G2B (सरकार ते व्यवसाय) :** व्यवसायांसाठी परवाने, नोंदणी आणि इतर सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देणे.

**३) G2G (सरकार ते सरकार) :** विविध सरकारी विभाग आणि स्तरांमध्ये माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे.

Research Hub International Journal

**४) G2E (सरकार ते कर्मचारी) :** सरकार आणि कर्मचारी यांच्यातील संवाद अतिशय जलद आणि कार्यक्षम होते.

**महाराष्ट्रातील उदाहरणे :**

- **आपले सरकार पोर्टल :** नागरिकांना विविध सरकारी सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारे पोर्टल, उदा. सेवा हमी कायदा (Right to Service Act) अंतर्गत सेवा.
- **डिजिटल महाराष्ट्र :** संपूर्ण शासनाचे डिजिटायझेशन करण्यावर भर देणारा उपक्रम.

**फायदे :**

- **सुविधा :** कधीही, कुठूनही सेवा उपलब्ध.
- **पारदर्शकता :** कामकाजात सुलभता आणि भ्रष्टाचार कमी होण्यास मदत.
- **कार्यक्षमता :** जलद सेवा आणि कमी कागदपत्रे.
- **सहज :** सहज सेवा केंद्रांमार्फत मिळणाऱ्या सुविधा (पॅन कार्ड, जन्म-मृत्यू दाखले. इत्यादी)
- **थोडक्यात :** ई-गव्हर्नन्स म्हणजे तंत्रज्ञानाच्या मदतीने शासन अधिक 'स्मार्ट', सोपे आणि जनतेसाठी सुलभ बनविते. मात्र ई-गव्हर्नन्स यांचे तोटे देखील आहेत.

**तोटे :**

**१) डिजिटल निरक्षरता :** भारताचा किंवा महाराष्ट्राचा विचार केला तर इथे बऱ्याच लोकांना अजुनही इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा चांगला वापर कसा करायचा हे माहित नाही. यामुळे ई-गव्हर्नन्सची सोय रद्द होते.
**२) इंटरनेट सुलभतेचा अभाव :** अनेक भागांमध्ये इंटरनेटचा अभाव ई-गव्हर्नन्सच्या परिणामकारकतेला कमी करते.
**३) मानवी संवादाचा अभाव :** ई-गव्हर्नन्सच्या बाबतीत मानवी संवादाचा अभाव आहे. दिवसा अखेरीस जनतेला भेडसावणाऱ्या समस्या त्यांच्या हितासाठी काम करणाऱ्यांनी ऐकून घेतल्या पाहिजेत.
**४) डेटाला धोका :** तुमचा वैयक्तीक डेटा चोरीला जाण्याचा धोका आहे.
५) ई-गव्हर्नन्समुळे प्रशासनाच्या कृती अधिक ढिलाई होऊ शकतात, जिथे ते तांत्रिक समस्यांच्या बहाण्याने लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करू शकतात.

**महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण :**

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामान्य जनतेस शासनाच्या सर्व सेवा माफक दरात प्रभावी, पारदर्शक रित्या व जलदगतीने दयावयाच्या आहेत. सत्तारूढ पक्षाच्या संयुक्त जाहिरनाम्यात शासकीय सेवा एकत्रित रित्या पुरविण्याबाबत अभिवचन देण्यात आले आहे. राज्याच्या विविध विभागांमार्फत ई-प्रशासन प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता, एकरूपता व सुसंगतपणा असणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेता ई-प्रशासन धोरणाचा मसूदा तयार करण्यासाठी डॉ. विजय भटकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली

Research Hub International Journal

होती. या समितीने तयार केलेल्या ई-प्रशासन धोरणाबाबतचा मसुदा शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारे शासन सेवा जनतेला माफक दरात पुरविण्याबाबत महाराष्ट्र राज्याच्या ई-प्रशासन धोरणावर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**ई-प्रशासन धोरण २०११**

**प्रस्तावना :**

- महाराष्ट्र शासन भारतात ई-प्रशासन व माहिती आणि संगणक तंत्रज्ञानाचा पाया रचणाऱ्यांपैकी एक आहे.
- महाराष्ट्र शासन नागरिकांच्या गरजा आणि उत्तम प्रतीची सेवा पुरवणाऱ्या ई-प्रशासन बाबतचे कार्यक्रम राबविण्यात आघाडीवर आहे.
- अधिकाधिक पारदर्शकता आणि प्रशासन प्रक्रियेबाबतची माहिती मिळण्याची सुलभता या गोष्टींवर राज्याच्या ई प्रशासनाचा मुख्य भर राहिला आहे.
- हे धोरण म्हणजे राज्यातील ई-प्रशासनाचा अधिक विकास करण्यासाठीचे पुढचे पाऊल आहे.

**व्हिजन आणि उद्दिष्टे :**

- ई-प्रशासन क्षेत्रात राज्य करीत असलेले नेतृत्व कायम राखण्यासाठी व ते अधिक समर्थ होण्यासाठी तसेच एम (मोबाईल) प्रशासनाकडे राज्याची वाटचाल करणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे.
- नागरिकांना विविध सेवा ऑनलाईन पद्धतीने शासकीय कार्यालयात न जाता त्यांना नजिकच्या ठिकाणी कमीतकमी दरात पुरविण्यासाठी हे धोरण दिशा ठरवेल.
- शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमपणे आणि कागदरहीत करणे हे या धोरणामूळे शक्य होणार आहे.

**धोरणाची व्याप्ती :**

हे धोरण महाराष्ट्रातील अशा सर्व संस्थांना लागू होईल ज्या केंद्र अथवा राज्य शासनाच्या कायद्यानुसार स्थापन केलेल्या असतील, आणि अशा संस्था ज्यांच्या रचनेत आणि प्रशासनात मुख्यत: सरकारचे नियंत्रण असेल, किंवा केंद्र अथवा राज्य शासनाच्या मालकीच्या असतील किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असतील. खालील संस्थांना हे धोरण मार्गदर्शक स्वरूपात लागू राहिल, ज्यांना राज्य शासनाकडून कोणत्याही स्वरूपातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत मिळत असेल (या मदतीमध्ये वेळोवेळी जाहीर केलेली मदत या बाबींचा समावेश असेल) किंवा अशा संस्था ज्यांचे कार्य सार्वजनिक स्वरूपाचे अथवा हिताचे असेल किंवा अशा संस्था ज्यांचे पदाधिकारी शासनाकडून नेमलेले असतील.

हे धोरण राज्य शासन समाविष्ट असलेल्या भागीदार असलेल्या किंवा संयुक्त संस्था स्थापन केलेल्या कंपन्यांनाही लागू असेल.

**उद्दिष्ट विधान :**

Research Hub International Journal

1. शासनाच्या विविध विभागांनी पुढाकार घेऊन त्या विभागात ई-प्रशासनाची अंमलबजावणी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत.
2. शिवाय प्रत्येक विभागाने हे-प्रशासनाबाबत व्हिजन निश्चित केले आहे.
3. अशा विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आणि त्यांनी परस्पर सहचर्याने काम करावे असे एकात्मिक पर्यावरण निर्माण करणे, ज्याद्वारे शासनाकडून नागरिकांना, सरकारकडून व्यवसाय क्षेत्राला आणि शासनाच्या विविध खात्यात एकमेकांना दिल्या जाणाऱ्या शासनाकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना सर्व सेवा कमीत कमी खर्चात आणि विनाअडथळा सलग स्वरूपात देता याव्यात म्हणून हे ई-प्रशासन धोरण तयार केले आहे.
4. हे धोरण राज्यात ई-प्रशासन यंत्रणा (System) आणि उपयोजित कार्यक्रमांची (Applications) निर्मिती आणि अंमलबजावणी करण्यासाठीची चौकट तयार करेल.
5. शासनाच्या विविध विभागातील महत्वाच्या कर्मचारी वर्गात बदल झाला तरी ई-प्रशासनाचा हेतू आणि निर्धारित दिशेने अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच चालू रहावी म्हणून हे धोरण याबाबत एक यंत्रणा निर्माण करेल.
6. हे धोरण नागरिकांना शासनाकडून स्वत:हून सेवा देता याव्यात यासाठी विविध विभागांना चालना देण्याचे काम करेल.
7. शासनाच्या धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत जनतेचा अधिक सहभाग मिळविण्यासाठीची पद्धत हे धोरण तयार करेल.

**युआयडीचा वापर :**

1. योग्य लाभार्थ्यांना आवश्यक सेवा मिळण्यासाठी जे ई-प्रशासनाचे प्रकल्प हाती घेतले जातील त्या प्रकल्पांमध्ये युआयडी चा वापर कालबद्ध पद्धतीने करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समिती/उच्चाधिकार समिती प्रत्येक प्रकल्प मंजुर करतांना तो युआयडीशी संलग्न असल्याची खात्री करेल.
2. विभागांकडून वेगवेगळ्या योजनांसाठी देण्यात येणाऱ्या सेवासुविधांकरिता विविध प्रकारची ओळखपत्रे/स्मार्ट कार्डस यांचा वापर टाळून बायोमेट्रीक ओळख पद्धतीवर आधारीत युआयडी क्रमांकाचा वापर करून सेवा पूरविण्यात येतील.

**सेवा प्रदान करण्याचे मार्ग :**

1. शासन नागरिकांना विविध सेवा घरपोच मिळण्यासाठी सेवा प्रदान करण्याचे विविध मार्ग उपलब्ध करेल.
2. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पोर्टलच्या धर्तीवरच असलेल्या राज्य शासनाच्या पोर्टलवर सर्व नागरी सेवा थेट उपलब्ध केल्या जातील तसेच त्या महा ई-सेवा केंद्र, सेतु, सीएफसी, मोबाईल इत्यादीसारख्या माध्यमातुन नागरीकांना उपलब्ध केल्या जातील.
3. सर्व शासकीय विभागाची संकेतस्थळे आणि पोर्टल राज्य शासनाच्या संकेतस्थळाशी जोडलेली असतील. या सर्व संकेतस्थळांवर साधारण देखरेख करण्याची यंत्रणा विकसित करण्यात येईल.

Research Hub International Journal

4. राज्य शासनाचे पोर्टल सर्व नागरिकांना उपलब्ध राहील.
5. संकेतस्थळासंबधी केंद्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचीपूर्तता राज्यशासनाकडून तयार करण्यात येणाऱ्या संकेतस्थळ/वेबॲप्लिकेशनची निर्मिती करतांना केली जाईल. हे संकेतस्थळ व वेबॲप्लीकेशन विविध ब्राउझर आणि ऑपरेटींग सिस्टिमवर काम करू शकेल तसेच त्यास सुरेक्षेचे योग्य ते प्रमाणपत्र असेल. तसेच वेब ॲक्सेसिबिलिटीसंबंधी मार्गदर्शक तत्व (Version 2, Level A) ची पुर्तता करेल.
6. नागरिकांना सेवा प्रदान करण्यासाठी मोबाईल फोनवर आधारित ॲप्लिकेशन्स, कॉल सेंटर्स, आयपीटीव्ही अशा अनेकविध मार्गाचा वापर करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल.
7. राज्यामध्ये एम-प्रशासनाला (Mobile-Governance) प्रोत्साहन देणे हा शासनाचा प्रयत्न राहील. त्या करिता शासन योग्य ते मानके आणि एसएमएस, मोबाईल सर्वीस गेटवे, मोबाईल ॲप्लीकेशन इत्यादी पायाभूत सुविधांची निर्मिती करेल. विशेषत: गाव पातळीवरील माहिती घेण्यासाठी मोबाईल आधारीत यंत्रणा प्रथमत: विकसित करून वापरण्यात येईल. मोबाईल संदेश सावधानतेचा इशारा देण्यासाठी आणि माहितीच्या देवाण-घेवाण करीता वापर केला जाईल.
8. ई-प्रशासनाबाबत नागरिकांना माहिती देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल व याकरिता आवश्यक ती काळजी घेऊन सोशल नेटवर्कींगचा वापर करण्यात येईल.

**सेवा प्रदानता द्वार (सर्व्हिस डेलिवरी गेटवे) :**

1. राज्य शासनाचे पोर्टल आणि ई-प्रशासनाचे विविध संगणकीय कार्यक्रम यामध्ये संगणकीय माध्यम म्हणून राज्य शासन एक सेवा प्रदानता द्वार (स्टेट सर्व्हिस गेटवे) निर्माण करत आहे. जे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा प्रदानता द्वार या प्रमाणेच असेल.
2. सेवा प्रदानता द्वार हे सेवा देणारे आणि सेवा घेऊ इच्छिणारे यांच्यामधील संवादासाठी मध्यवर्ती केंद्र असेल.
3. महसुली जमा, खर्च, परतावा आणि मोबाईलवर आधारित पेमेंट सेवा पुरवण्याकरिता पेमेंट गेटवे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून कोषागारे आणि वित्त विभागाच्या सहकार्याने विकसित करण्यात येईल.
4. माहिती तंत्रज्ञान विभाग तंत्रज्ञानाचा वापर, मोबाईल तंत्रज्ञानाद्वारे देयके आणि अधिप्रमाणिकता करण्यासहित, वित्तीय समावेशनासाठी (Financial Inclusion साठी) प्रोत्साहन देईल. त्यासाठी राज्य/केंद्र शासनाचा वित्त विभाग, युआयडीएआय आणि अन्य वित्तीय संस्थांचे सहकार्य घेण्यात येईल.
5. महाराष्ट्र सार्वजनिक सेवा अनिवार्य इलेक्ट्रॉनिक प्रदानता (MMEDPS)

**अधिनियम :**

1. नागरिकांना संगणकीय पद्धतीने सेवा देण्यासाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक सेवा अनिवार्य इलेक्ट्रॉनिक प्रदानता अधिनियम अस्तित्वात आणेल ज्या अन्वये सर्व शासकीय कार्यालये आणि विभागांना विशिष्ट नागरी सेवा ऑनलाईनद्वारे थेट सेवा देणे सक्तीचे राहिल.
2. या अधिनियमाद्वारे प्रत्येक नागरिकाला या सेवा थेट संगणकावर (ऑनलाईन) घेता येण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

3. सर्व शासकीय विभाग पूर्व निश्चित कालावधीमध्ये विविध माहितीचे नमुने, परवाने, प्रमाणपत्रे, मंजुरीपत्र पैसे भरणे व त्याची रिसीट, अर्ज भरणे, अर्जाच्या सद्य:स्थितीची तपासणी, इत्यादी सर्व व्यवहार थेट संगणकावर (ऑनलाईन) करतील.
4. सर्व शासकीय विभागांना त्यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने देण्यात येणाऱ्या सेवा जाहीर करणे हे या काद्यान्वये अनिवार्य असेल.

**आवश्यक पायभूत सूविधा :**

1. महाराष्ट्र शासनाचे वाईड एरिया नेटवर्क (MSWAN) ने राज्याचे मुख्यालय सर्व विभागीय मुख्यालये, सर्व जिल्हा मुख्यालये, सर्व तालुका मुख्यालये, सर्व प्रमुख केंद्रे एकमेकांशी जोडले जातील आणि माहिती, आवाज आणि चलचित्रांच्या देवाणघेवाणीसाठी सुरक्षित महाजाल सुविधा पुरविण्यात येईल.
2. कार्यालयांना जवळच्या पीओपी पासून समांतर जोडणी पुरविली जाईल.
3. महाराष्ट्र शासनाचे वाईड एरिया नेटवर्क (MSWAN) द्वारे सरकारी कार्यालयांना व्हीपीएन ने जोडले जाईल.
4. आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्तीमध्ये तातडीच्या मदतीसाठी उपग्रहाद्वारे व्हीसॅटची यंत्रणा कार्यान्वित केली जाईल.
5. राज्य शासनाच्या प्रत्येक कार्यालयांमध्ये इंटरनेट जोडणारी सुविधा (इंटरनेट कनेक्टीव्हीटी) असेल, जी शक्य तेथे ब्रॉडबँड स्वरूपाची असेल (तार किंवा बिनतारी) राज्यशासनाची गावपातळीवरील कार्यालये नेटवर्कद्वारे जोडण्यात येतील.
6. शासकीय कामकाज परिणामकारक करणे आणि प्रवास खर्चात कपात करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, व या सुविधेचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.
7. संपूर्ण राज्यासाठी शासन ते नागरिक (G2C), शासन ते व्यवसाय क्षेत्र (G2B), शासन ते शासन (G2G), शासन ते कर्मचारी (G2E) आणि अशा सर्व सेवांसाठी स्टेट डेटा सेंटर (SDC) उभारले जाईल.
8. स्टेट डेटा सेंटर व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास राज्य शासन इतर खाजगी/सार्वजनिक क्षेत्रातील डेटा सेंटरच्या सुविधा पुरविण्याऱ्या संस्थांकडून सेवा घेईल.
9. डेटा सेंटर शासनाच्या विविध विभागांना आपली सर्व्हर सुविधा ठेवण्याकरिता, आज्ञावल्यांना जागा उपलब्ध करून देण्याकरिता, डेटा सेंटरचे व्यवस्थापन करण्याकरिता, आपत्कालिन परिस्थितीत माहितीची पुर्नलाभ करणे, माहितीच्या प्रती तयार करणे यासारख्या सुविधा प्रदान करेल.
10. सर्व सेवा विनंत्यांना त्वरित प्रतिसाद देता यावा याकरिता डेटा सेंटरमध्ये पुरेशी बँडविड्थ क्षमता असेल याची काळजी घेतली जाईल.
11. डेटा सेंटरमध्ये आपत्ती आल्यास सर्व माहितीचा पुर्नलाभ आणि कामकाज विनाअडथळा सुरू रहावे यासाठी पुरेशी आपत्कालीन माहिती पुर्नलाभ प्रणाली ठेवली जाईल.
12. ग्रामीण विभागासह राज्याच्या सर्व भागात अतिजलद संगणकीय महाजाल सेवा सुविधा (हाय-स्पीड ब्रॉडबॅन्ड इंटरनेट) मिळण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असेल.

Research Hub International Journal

13. आयसीटी यंत्रणेमध्ये पर्यावरणाला अनुकूल (Green IT) अशा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर मुख्य भर असेल, अशा प्रकारे ई-गव्हर्नन्स धोरणाद्वारे महाराष्ट्र शासन सेवा प्रदान करते.

**संदर्भ सुची :**


- https:www.westfordonline.com
- https:en.wikipedia.org
- https:www.nextias.com
- https:www.researchtrend.net
- https:negd.gov.in
- https:testbook.com
- https:Wikipedia.org/Internationalrelation's
- www.maharashtra.gov.in


Research Hub International Journal